म. ग्रं. सं. ठाणे

विषय नाटक

लेखक खरे. ना. व.

१९८

संग्रहालय क्रमांक १९२

पुस्तकाचें नांव श्री ... राज्याभियोग उत्तरार्ध

# ... नाटक

गोविंद महादेव विश्रांत
बुकनंबर
भिंवडी.
खासगी पुस्तकालय.

तीर्थरूप रा० रा० वासुदेव काशिनाथ

खरे फौजदार संस्थान वडोदें

यांचे चरणारविंदीं हें पु-

स्तक पितृभक्तीनें

अर्पण केलें

असे.

# प्रस्तावना.

प्रसिद्ध कै० रा० रा० बळवंतराव पांडुरंग ऊर्फ आणासाहेब किर्लोस्कर यांनीं संगीत नाटकांचा प्रचार आलीकडे नवीनच घालून देऊन त्याकरितां त्यांनीं तीन संगीत नाटकेंही तयार केलीं हें सर्वश्रुत आहेच. हीं नाटकें किती मनोवेधक व सुरस झालीं आहेत हें रसिक जनास जास्त खुलासा करून सांगितलें पाहिजे असें नाहीं. परंतु रा० आणांच्या तीन संगीत नाटकांपैकीं "रामराज्य वियोग" हें नाटक त्यांच्या अकालीं मरणानें अर्धेंच राहिल्यामुळें त्या नाटकाचा चटका पुष्कळ लोकास लागून गेला होता.

रा० आणासाहेब जर हयांत असते तर एवढ्या अवकाशांत त्यांनीं या अर्धवट नाटकास कधींच पुरें करून सोडलें असतें; व ते स्वतः गुणी व या कालांतील प्रति कालीदासच असल्यामुळें त्यांचें तें राहिलेलें नाटक इतर दोन्ही नाटकांप्रमाणेंच अप्रतिम झालें असतें यांतही बिलकुल शंका नाहीं. तथापि त्यांच्या "रामराज्यवियोग" नाटकाचा उत्तरार्ध जरी त्यांच्यासारखा अप्रतिम व्हावयाचा नाहीं, तरी त्यांचा तें नाटक पुरें करण्याचा जो हेतु तो त्यांच्या मागें स्वशक्तिनुसार पुरा करावा अशी स्फूर्ति मनास झाल्यावरून हा दोन अंकी उत्तरार्ध मी रचिला आहे.

कै० रा० आणांची तोड या उत्तरार्धांत याव-याची नाहीं हें मी जाणूनच आहे, तथापि त्यांचें तें नाटक अर्धेंच रहाण्यापेक्षां कसें कां होईना पण पुरें व्हावें ही माझी उत्कट इच्छा असल्यानें मी हा अल्प प्रयत्न केला आहे. तरी याच्यांतील दोषाबद्दल रसिक जन क्षमा करून गुण तेवढाच घेतील अशी मी आशा बाळगून व कै० रा० आणासाहेब किर्लोस्कर यांचें एकवार स्मरण करून मी हा लेख पुरा करतों.

पुणें, तारीख १ माहे नोंवेंबर सन १८८७. } त्रि. वा. खरे.

॥ श्रीशंकर प्रसन्न. ॥

# श्रीरामराज्य वियोग.

## उत्तरार्ध.

## अंक ४:

### प्रवेश १ ला.

स्थळ—राजवाडा.

( रामलक्ष्मण बसले आहेत. )

राम—बाळा लक्ष्मणा, गुरुमहाराज अजून कां वरें आले नाहींत ? सकाळपासून मन अगदीं उद्विग्न झालें आहे. आणि गुरुजी तर येत नाहींत यामुळें मनाला उगीच हुरहुर लागली आहे. ( दुश्चिन्ह झालेंसें दाखवितो. )

पद

( या विण मजला कांहीं सुचेना या चालीवर. )

होत असे हें विपरीत मातें ॥
दुश्चिन्हचि हें मजला गमतें ॥ ध्रु० ॥

वाम भुजेचें स्फुरणाचि होई ॥
धीर मनीचा सोडून जाई ॥
मन धडधड करी शंकित होतें ॥

लक्ष्मण—दादा "सुखांतही दुःख असतें" तसें आपणास युवराज झाल्यावरही सर्व राज्याचा भार सांभाळून दुष्टांचें निर्मूलन करणें, चोंहिकडे शांतता ठेवणें, जनसौख्याविषयीं दक्षता बाळगणें वगैरे अनेक यातायाती कराव्या लागणार, त्याचेंच हें दुश्चिन्ह दिग्दर्शन करीत आहे, दुसरें काय? गुरुजीही राज्याभिषेकाच्याच खटपटींत असतील.

राम—काय असेल तें असो. गुरुमहाराज आल्यावांचून कांहीं स्वस्थ वाटणार नाहीं. ( पडद्याकडेपाहून ) लक्ष्मणा, ते कोण: सुमंत प्रधानजी इकडसच येत आहेत नाहीं बरें ?

( सुमंत गडबडीनें प्रवेश करितो. )

लक्ष्मण—हो तेच. ( सुमंताकडे पाहून ) यावें दिवाणजी, आज काय तुमची फार धांदल उडाली आहे ना ?

सुमंत—बाळांनों कसची धांदल आणि कसचें काय ! महाराजांकडे तुम्हांला नेण्यासाठीं आलों आहे. उठा लवकर चला माझे बरोबर.

[ सर्व उठून चालूं लागतात. ]

राम—लक्ष्मण—[ सभय ] काय महाराजांनीं बो-

लाविलें आहे ? तुह्मी असे कां ? इतकी घाई कशाची ? गुरुजी कोठें आहेत ?

सुमंत—गुरुमहाराजांनीं बोलाविलें आहे. महाराजांची प्रकृति थोडी अस्वस्थ आहे ह्मणून गुरुजी त्यांचेच जवळ वाड्यांत बसले आहेत. चला लवकर [ जातात. ]

## प्रवेश २ रा.

स्थळ—राजवाडा.

[ टेंकून बसलेल्या दशरथाचा हात पहात वशिष्ट बसले आहेत; आणि कैकई जवळ उभी आहे. ]

वशिष्ट—( सचिंत ) रामाला घेऊन दिवाणजी केव्हां येतील ते येवोत ? महाराजांच्या प्रकृतीचें मान तर अधिकाधीक असाध्य होत चाललें आहे ! !

दशरथ—( व्याकुळ होऊन ) अजून माझा राम आला नाहींना ! राम ! राम ! राम !

( राम–लक्ष्मणासह सुमंत येतो. )

राम—लक्ष्मण—[ घाबरून नमस्कार करितात. ] गुरुजी [ दशरथाकडे बोट दाखवून ] एकाएकीं प्रकृति इतकी कशानें बिघडली ? झालें तरी काय ?

वशिष्ट—( गहींवरून ) बाळा तुला काय सांगूः—

पद

( स्वामि दत्त दिगांबर वनमो या चा० )

वदु काय तुला मी रामा ॥
मुनि मानस नेत्र विरामा ॥
तात तुझा हा सूज्ञ असोनी ॥
व्याकुळ पडला पाही ॥
काय दशाही याची झाली ॥
कारण कैकई होई ॥ १ ॥

राम—[ कैकईकडे वळून ] आई—

पद

( शिगलासी माझ्या बारे या चा० )

वद मातें कारण आई ॥
हा बालक लीनचि पायीं गे ॥ धृ० ॥
काय असें हें ताता होतें ॥
तळ मळ करितो पाही गे ॥ वद ॥ १ ॥
झडकरि मजला वृत्त कथी तूं ॥
मानस स्वस्थ न राही गे ॥ २ ॥

कैकई—तुझ्याशिवाय दुसरें कोणतें असणार !

पद

[ तस्करा हातीं या चा० ]

परिस तूं रामा वृत्त सर्व पहिलें ॥
कारण परिणामा झालें ॥ परिस ॥ धृ० ॥
प्रसंगीं मजला वर यानें दिधले ॥
करीं अजि पूर्ण असें वदलें ॥
वचन हें अपुलें ॥ दुर्घट मनिं आणिलें ॥

ह्मणुनिया नीप असें केलें ॥
अरे मम हेतू जरि ना पुरवीले ॥
कुलासह नरकीं बुडवील ॥ परिस ॥ १ ॥

राम०—महाराजांना पूर्ण करण्यास कठीण असे वर तरी कोणते ?

कै०—अरे कोण ह्मणते कठीण. पुरे करून दाखीव ह्मणजे झालं पूर्ण करणें हें तुझ्याकडे आहे.

राम०—काय माझ्याकडे ? माझ्याकडे असेल तर इतकेंही करीन—

पद

(भूपमभेता रामावरती या चा० )

भाशीन हलाहल माते ॥
देइन मी मम जीवाते ॥ किति वदूं ॥
त्यागीन खचित् भार्येतें ॥
मम जननी कौसल्येतें ॥ किति० ॥
सिंहासन अप्रिय होतें ॥
ताताहुनि प्रियनच मातें ॥ किति वदूं ॥
॥ चाल ॥ वच असे स्पष्ट वदतसे अन्यथा नसे समज तूं माते, प्रभु देवो यश नेमाते ॥१॥

कै०—अरे इतकें जर तूं करायला तयार झाला आहेस तर मग—

पद

(गंगानदी ती सागर सोडूनि या चा०)

अभिषेकचि तो भरता व्हावा ॥ वनवासा तूं जावें ॥
चवदा वरुषें वनवासी तूं होउनि यांच राहावें ॥ १ ॥

जटा भार तो तव शिरीं राहो ॥ वल्कल वस्त्र असावें ॥
कंदमुळातें भक्षुनी रामा आनंदें विचरावें ॥

रा०—इतकेंचना ? यांत काय कठीण आहे ? (दशरथांकडे पाहून ) महाराज याबद्दल इतकं अवघड कशाला वाटायला पाहिजे ? हा आतां मी निघालों.

दशरथ—( दुःखानें ) रामा—

पद

( उद्धवा शांतवन करजा या चा० )

बा माझ्या आत्मारामा, सोडुनिया जाशी मातें ॥
हा वियोग अग्नी भडके, भाजितया मम आत्म्यातें ॥
हें दुःख कसें सोसूं मीं, अनिवाराचि मजला होतें ॥
॥ चाल ॥ दुर्दैवी जन्मा आलों ॥ जन्मतांचि नाहीं मेलों ॥
स्त्रीवश मी कैसा झालों ॥ लांच्छन हें आणि कुलातें ॥
बा माझ्या ॥ १ ॥

हरहर ! ! बाळा रामचंद्रा माझ्यामुळें तुला वनवास ना ! ! (असें ह्मणून रामास आलिंगन देतो.)

रा०—बाबा आपलें वचन पूर्ण करणें माझा धर्मच आहे मी तर मोठ्या आनंदानें वनवासी होईन.

पद

( या उपवनींची सुंदर शोभा या चालीवर. )

दुःख मनीं मज नाहीं ॥ वास वनाचा सुखकर होई ॥ दुःख ॥ धृ ॥
विपिनीं राहिन आनंदानें ॥
राज्य करावें मम भरतानें ॥

कष्ट न व्हावे या विरहानें ॥
पुनरपि खचितचि परत मी येईं ॥ दुःख ॥ ४ ॥

कै०—जा तर मग.

राम—मातोश्री सर्वांचा निरोप घेऊन आज्ञेप्रमाणें करितों. ( असें ह्मणून जातो. )

वशिष्ट—रामचंद्रा धन्य तुझ्या पितृभक्तीची!! कैकई; शेवटीं तुझ्या दुष्ट हेतूचाच जय झाला ना!!

कै०—अजून थोडा अवकाश आहे.

वशिष्ट—( दीर्घ उश्वास टाकून ) शिव शिव!! वाहवारे पुत्रवात्सल्य? ( कैकईकडे पाहून ) अगे माझा राम कधींही मागें सरणार नाहीं समजलीस?

कै०—बरं तर, तो जातो किंवा नाहीं हें पाहण्याला मीही तिकडेसच जातें.

( पडदा पडतो. )

## प्रवेश ३ रा.

( लक्ष्मण प्रवेश करितो. )

लक्ष्मण—काय हा प्रसंग!! आज सकाळपासून दादांना जीं दुश्चिन्हें होत होतीं त्यांचेंच हें प्रत्यंतर! कोण दुष्ट वासना ही—भरताला राज्याभिषेक होईना, खुशाल होवो. पण दादांना वनवास काय ह्मणून? आणि तोही चवदा वर्षे? बरें इतकेंही करून हिला काय

मिळणार कोण जाणे ? असो, दादा वनवासाला जाणारच मग मला तरी येथें राहून काय करायचें आहे ? दादा शिवाय एक क्षणभर देखील मला चैन पडणार नाहीं. दादा बरोबरचे असलों ह्मणजे अयोध्या काय आणि अरण्य काय सर्व सारखेंच. आपणही दादा बरोबरच जावें ( विचार केल्यासारखें करून ) हो झाला हाच माझा निश्चय.

( इतक्यांत राम प्रवेश करितो. )

**राम**—लक्ष्मणा निश्चय कसला नि करणार काय ?

ल०—दादा मी आपल्या बरोबर येणार.

रा०—बाळा तूं रे आणखी कशाला माझे बरोबर येतोस ?

ल०—नाहीं नाहीं जिकडे आपण तिकडे मी.

**रा०**—( दुःखानें ) बरं तर चल कौसल्या, सुमित्रा वगैरे सर्वत्रांचा निरोप घेण्यास मी निघालों आहे. तर तूंही चल माझे बरोबर. ( जातात. )

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ४ था

---

( तुळसीची पूजा करीत कौसल्या बसली आहे
( जवळ ब्राह्मण उभा आहे. )

**रामलक्ष्मण येतात.**

**राम लक्ष्मण**—आई आह्मी नमस्कार करितों.

कौ०—रामा अरे तुला राज्याभिषेक व्हायच्याना मग तूं या वेळेस इकडे कसा आलास ?

रा०—आई आम्हीं वनवासाला जात आहों म्हणून तुझा निरोप घेण्याकरितां आलों आहों तुझेंही त्यास अनुमोदन असावें.

कौ०—रामा, लक्ष्मणा, कायरे तुम्ही म्हणता ! ! वनवासाला जायचं आणि माझें अनुमोदन मी कांहीं समजलें नाहीं. कोणी, गुरु महाराजांनीं कां सांगितलें ?

रा०—लक्ष्मणा तर मग आईला अजून ह्या गोष्टीची वार्ताच नाहीं अं—( कौसल्येकडे ) आई कैकईला तातांनी पूर्वीं दोन वर दिले होते ते आजच पूर्ण करावे असा आग्रह म्हणून—

कौ०—असे कोणते ते वर बाबा ?

रा०—ऐक—

## साकी.

राज्य पदारुढ भरतचि व्हावा । वनवासा मी जावें ॥
हेचि दोन वर दिधले तातें । पूर्ण कराया जावें ॥
ऐसें मज वाटे, नातरी लांछन तें मोठें ॥ १ ॥

( हें ऐकून कौसल्या मूर्च्छित होते. राम–लक्ष्मण वारा घालतात. )

राम—आई सावध होग! यांत घाबरण्याजोगें कांहीं नाहीं.

कौ०—[ रामाला पोटाशीं धरून ] बाळा—

### पद

[ अजि शेवटचा लाभचि या चा० ]
मज सौख्य नसे रामा तुजविण कांहीं ॥
मम प्राण खचित तव ठायीं ॥
किती कोमल रे कोमल तव तनु पाही ॥
वनवास विलासी होई ॥ चाल ॥
बाळा तुज कोठें पाहूं ॥
" रामा " मग कोणा बाहूं ॥
तव वियोग कैसा साहूं ॥
येतें मी येत सख्या लवलाही ॥
मम वच हें ध्यानीं घेई ॥ १ ॥

राम—आई हें काय बरें ? निरोप देणें एकीकडे राहून हे दुसरेच विचार कशाला पाहिजेत ? आह्मीं लवकरच परत येऊं.

कौ०—रामा,

### पद

[ रुचती कां तीर्थयात्रा या चा० ]
देवो हें राज्य सारें भरतातें भूपती ॥
आशाही वसत नाहीं ममचित्तीं अल्प ती ॥
तुजविण हे जन मज सारे शून्यचि कीं दीसती ॥
तुजला कां वना धाडी नकळे बा रघुपती ॥ १ ॥
आणखी—

### पद

[ वद जाऊं कुणाला शरण या चा० ]
तव तात गुरू सूज्ञते सांगती तुतें वना जाई ॥

मम आज्ञा मुख्यची घेई ॥ अरे सखयारे ॥
मम प्राण सर्व तूं जाण अशी मी आण खचित वाही॥
जिवदान मला तूं देई ॥ अरे सखया ॥
वदूं काय अरे मी गाय मोकली धाय कशी पाही॥
मनीं निष्ठुरता ती कां ही ॥ अरे सखयारे ॥ १॥

राम——आई तूं ह्मणतेस तें सर्व खरं आहे, परंतु किंचित विचार करून पहा ह्मणजे झालें. तुला सर्व समजेल कीं, मायामोहामुळें तुझी अशी स्थिति होत आहे. प्राणीमात्र मायेनें बद्ध झाल्यामुळें असें होणें सहाजीकच आहे, पण आई खरा विचार पाहूं गेलें असतां हा पसारा सर्व लटिका आहे असें दिसून येतें, तेव्हां या लटक्या घडामोडींत सौख्या-चा सतत संभव कितीसा असेल बरं ?

आई ऐक——

पद

[ प्रीतीस पार नसे या चा० ]
पहा हें नश्वर सर्व असें ॥
चिर सुख यांत नसें ॥ धृ० ॥
अखिल चराचर व्यापुनि तो प्रभु ॥
लिप्त कधींही नसे ॥ १ ॥
ह्या दृग्भासा थारा नाहीं ॥
सागरीं लाट तसें ॥ २ ॥
ज्ञानांजन हें लेउनि पाही ॥
चिद्रूप मग वीलसे ॥ ३ ॥

म्हणुनी विनायक बलवंतचि तो ॥
ध्याउनी स्वस्थ बसे ॥ ४ ॥

आई हें तूं जाणत नाहींस काय? सर्व जाणत आहेस. मग उगीच शोकाकुल कां होतेस बरं?

कौ०—काय सांगूं रे रामा. तुझा वियोग या विचारास थाराच देत नाहीं. कान त्याशिवाय कांहीं ऐकत नाहींत, डोळे तुजवांचून आतां कांहीं पहात नाहींत, माझें समाधान या शोकावांचून दुसरें कांहीं नाहीं, हाच माझा मित्र, हाच माझा सखा, रामा तूं तर जाणारच. मग या शोकाचं तरी निवारण कशाला करितोस?

पद

[ अंजनी गीत. ]

क्षण एकची जरी तुज ना पाही ॥
जीव कसा हा वेडा होई ॥
चवदा वरुषें जातिं कशीं हीं ॥
न कळे मज बाळा ॥ १ ॥

राम—[ आपल्याशीं ] ह्याला काय करावें! मातृममता कांहीं विलक्षण आहे खरीच. तीर्थरूपांच्या प्रतिज्ञेची परिपूर्णता! आणि मातोश्रीचा अनिवार शोक! इकडे असें आणि तिकडे तसें—जाण्याची परवानगी कशी मिळते कोण जाणे. ( उघड ) आई इतक

वेळ मी तुला सांगितलें तें सर्व व्यर्थच ना ? तूं जर मला संतोषानें परवानगी देणार नाहींस तर तो वनवास तरी मला सुखकारक कसा होईल ?

कौ०—( विचार केल्यासारखें करून ) बाळा माझें एवढें तरी ऐकतोस का ?

राम—आई खचीत ऐकेन, सांग पाहूं काय तें.

कौ०—ऐक—

पद

( सकल जगीं सारखे बंधु या चा० )

कठिण पणीं दुःख कसें साहूं
बहुत अवघड प्राण कसा हा ठेवूं ॥ धृ० ॥
मध्यंतरि तुज देइन भेटी ॥
वचन असें दे पाहूं ॥ १ ॥

राम—आई इतकेंचना ? ठीक आहे मध्यंतरी तुला खचीत भेटेन. ( लक्ष्मणाकडे पाहून ) चल आपण सुमित्रेच्या भेटीला जाऊं. आई जाऊं तर आतां आह्मी?

कौ०—( दोघांचीं मुखें कुरवाळून ) बाळांनो या बरं. ( राम लक्ष्मण जातात ) हे सकल देवाधि देवा, हे माते वसुंधरे, तूं सर्व जगाची जननी ह्मणवितेस त्या अर्थी तूं तरी त्यांना विसंबूं नकोस.

पद

( जाई परतोनि बाळा या चा० )

जाती बालक ते बाई ।

वसुंधरे तव पदरीं घाली
शरण तुला येतें बाई ॥ १ ॥
भक्त पालका प्रभु हृषिकेशी ॥
सांभाळी त्यां निर्जनदेशीं ॥
दुर्दैवी हे होत विदेशी ॥
कोणि नसे त्यांतें ॥ २ ॥

( कौसल्या जाते. )

## प्रवेश ५ वा.

स्थळ—सीतेचा महाल.

( सीता बसली आहे जवळ एक दासी उभी आहे )

चतुरिका—बाईसाहेब आपण आज सकाळपासून अशा कां बरें दिसता? सकाळपासून एकसारिखे विचार तरी काय चालले आहेत? बोलल्या सवरल्यावांचून लोकांनीं काय समजावें. कांहीं विकृति का झाली आहे? मला सांगा. वैद्यराजांना बोलावून आणूं का? ते आले ह्मणजे प्रकृति पाहून ताबडतोब कांहीं उपाय करतील.

सीता—चतुरिके बोलतेसच बाई फार. अग वैद्यराजांना बोलावून आणण्याजोगें कांहीं नाहीं.

चतुरि०—मग अशाहो कां चिंतातुर? मी केव्हांची विचारणार होतें पण ह्मटलें नको बाई सांगतील अंमळशानीं. आह्मी अक्षयीं सेवेंत

तत्पर असतां तुह्मी अशा उदासीन कां बरें ? आपण नीट असला ह्मणजे आह्मांला सगळं गोड, नाहीं तर कसंसच होतं.

सीता--पुरें बाई तुझें. मला कनई सकाळपासून असं वाटतं कीं कुणाशीं बोलूं नये, चालूं नये, कांहीं करूं नये. काय व्हायचें असेल तसें होईल. ( उश्वास टाकून ) देवा तुला सगळी काळजी आहे.

चतुरि०--हें काय बाई ! ! ! अशानें काय समजावें. बाईसाहेब नीट सांगा काय तें ?

सीता--रात्रीं कनई बाई मेलं एक स्वप्न पडलं. काय त्याचा अर्थ असेल तो असो पण तेव्हांपासून मला हुरहुर लागली आहे; आणि कांहीं सुचत नाहीसें झालें आहे.

चतुरि०--हातत्याच्या ! स्वप्नचना ! ! त्याचें तें काय मोठें. मला मेलीं हजारों स्वप्नें पडतात पण मी कुठें त्याचा एवढा विचार करितें. स्वप्नच तीं ! !

सीता--तुला कांहीं होत नाहीं पण मला जी तेव्हां पासून धडकी बसली आहे ती माझी मलाच ठाऊक.

चतुरिका-बाई साहेब स्वप्नांत कोणी भेवडावलें का आपल्याला ?

सीता--चतुरिके ऐक--

पद.

( किति कपटि असती तूं सवती. )

मम स्वप्न परिस तूं आतां ॥ सवेग ॥ धृ० ॥
घोर वनीं मीं पतिसह जाई ॥
कौतुक प्रेमें पहातचि राही ॥
दुष्ट लांडगा संनिध येई ॥
वाटे भक्षिल आतां ॥ सवेग ॥ १ ॥
स्वप्न कथानक यापरि आहे
काय सुचवि मज कळत नसेहें ॥
भीतिग्रस्त मन होउनि राहे ॥
देवा मज तूं त्राता त्राता ॥ २ ॥

हें सगळं मनांत आलेंकनई ह्मणजे अजून सुद्धां पोटांत कसं धस्स होतं.

चतुरिका—बाई साहेब स्वप्नांतल्या गोष्टीला इतकं कशाला भ्यायला पाहिजे! चला उठा वाड्यांतलें आतां आपल्याला बोलावणें येईल. आजचा सोन्यासारखा दिवस. रामचंद्र महाराजांना राज्याभिषेक व्हायचाना? आणि तुह्मीं आपल्या स्वप्नच घेऊन बसलांत याला काय ह्मणावें? आपली तर अजून कांहीं तयारी नाहीं.

सीता—अग तयारी तयारी ती कसली व्हायची? वेणी फणी तर झाली, आतां काय आंग धुणं झालं ह्मणजे झालं. चल तर मग आंग धुवायची तयारी कर.

चतुरिका—चला तर मग.

( असें म्हणून दोन पावलें पुढें जाऊन पडद्याकडे पाहून येते. )

रामचंद्रमहाराजांची स्वारी येत आहेसें वाटतें. हो त्यांचीच स्वारी आली.

( चतुरिका जाते व राम प्रवेश करतो. )

सीता—आज राज्याभिषेक व्हायचा नि यावेळेस स्वारी इकडे कशी आली?

राम—प्रिये तुझी परवानगी घेण्याकरितां.

सीता—हें काय बाई माझी कशाची परवानगी? युवराज होण्याला बायकांची का परवानगी लागते?

राम—सखे ही परवानगी विचारण्यास आलों नाहीं. मी आज वनवासाला जाणार आहें ह्मणून तुला विचारण्यास आलों आहे.

सीता—ह्मणजे? आज शिकारीला का जाणें होणार? राज्याभिषेक होण्यापूर्वी शिकार का करावी लागते? मला नाहीं हें कांहीं माहीत.

राम—प्राणसखे मला आतां नेहमीच शिकारी कराव्या लागतील. कारण मी आतां वनवासाला निघालों आहे.

सीता—( दचकून ) काय आपण ह्मणतां कोण जाणें मला नाहीं यांत कांहीं समजत.

राम—अग दशरथ महाराजांनीं पूर्वी कैकई मातो-

श्रींना प्रसंगीं जे वर दिले होते ते आजच पूर्ण करावे. तिचा आग्रह पडला ह्मणून ते कोणते ह्मणशील तर एक—

पद

( गंगानादि ती सागर सोडुनी या चा० )

अभिषेकचि तो भरता व्हावा ॥
वनवासा मीं जावें ॥
चौदा वरुषें वनवासी मी ॥
होउनीयाचि राहावें ॥
जटा भार तो मम शिरीं राहो ॥
वल्कल वस्त्र असावें ॥
कंदमुलातें भक्षुनि वनिं मी ॥
आनंदें विचरावें ॥ १ ॥

हे वर पूर्ण करण्यास्तव मलाआजच गेलं पाहिजे, तुझ्याकडून नकार नसावा ह्मणजे झालं.

सीता—( भयभीत होऊन ) असें आहे तर मीही आपल्या बरोबर येतें ह्मणजे झालं.

राम—वाहाव्वा ! हा नकार नाहीं, नकाराचा भाऊ. " मीं येतें " असें ह्मणतां लवकर आलें, पण रथांत बसून विलासबागेपर्यंत गेल्यानें सुद्धां श्रम होतात, तें आहेना ध्यानांत ? आणखी ह्मणे " मी येतें. "

सीता—तें कांहीं मी ऐकायची नाहीं. जिकडे आपण तिकडे मी येणारच.

राम—प्रिये—

मराठी ठाणे

पद.

( वीरशिरोमणी या चा० )

काय वदूं तुज प्राणसखे मम ॥
आग्रह न धरी मनीं ॥
कळे तुज सुविचारा सेवुनी ॥
सुगम नसे तो मार्ग भयंकर ॥
कंटक असती वनीं ॥
रुततिल पदकमला लागुनी ॥
व्याघ्र सिंह बहू क्रूर पशू ते ॥
असती त्यां पाहुनी ॥
भीशिल काय सौख्य घेउनी ॥

॥ चाल० ॥ हे प्रखर रवीकिर तापद तुजला अती ॥
बहू दाट तरूवर मार्ग न ते दीसती ॥
अनिवार गार ते वायु फार सूटती ॥
फल मूल वनांतिल जीवन तुजला सती ॥
सासु श्वशुर तव सेवी त्यांतें ॥
धैर्य मना देउनी ॥
वदतों समज मनापासुनी ॥

सीता--प्राणनाथ—

पद.

( असतांना यतिसंनिध या चा० )

वचन असें हें काय वदणें आजि मजला ॥
निष्ठुरताही काय मनिंना धिर उरला ॥
सासुरवासी सुख मज नाहीं ॥
होय वनीं वदुं काय हो ॥

पतिसेवा ती मुख्य सतीला ॥
प्राण जरी तो जाय । गमते प्रिय हिजला ॥ १ ॥

राम---( आपल्याशीं ) माझ्या बरोबर येण्याचा हिचा तर दृढनिश्चय दिसतो. बरं तर मग हिलाही बरोबर घ्यावीच. समयविशेषीं हिचाही उपयोग होईल. ( उघड ) बरं तर तुझी इच्छा आहे तर चल आटप. आपल्या निघण्याची तयारी कर.

सीता---बरें आहे, आज्ञेप्रमाणें तयारी करून येतें. ( जाते )

राम---कोण आहेरे पाहऱ्यावर?

द्वारपाळ---जी सरकार मी जयपाळ आहे.

राम---जयपाळा, सुमित्रा आईसाहेबांकडे लक्ष्मण गेला आहे तिकडे जाऊन त्याला मी येथें बसलों आहे ह्मणून सांग आणि लवकर बोलावून घेऊन ये.

जयपाळ---जी सरकार. ( जातो )

रा०---( आपल्याशीं ) मला तर वनवासाला गेलेंच पाहिजे. पण माझ्या बरोबर लक्ष्मणास वनवासी व्हावें लागणार ! ! न येण्याविषयीं पुष्कळ सांगून पाहिलें पण पूर्वींपासून माझ्याकडे त्याचा फार ओढा असल्यामुळें तो तर आपला आग्रह सोडीत नाहीं. सुमित्रा मातोश्रींचा निरोप घेण्याकरितां तो तिकडे गेला आहे. गेल्याला बराच वेळ झाला,

ह्मटलें ह्मणजे येवढ्यांत [illegible] बहुधा कौसल्येप्रमाणेच सुमित्रेचीही अवस्था झाली असावी ह्मणूनच त्याला यायला इतका वेळ लागला.

( इतक्यांत लक्ष्मण येतो. )

**राम**—लक्ष्मणा येथरं बैस. बाळा, फारसारे वेळ लागला ?

**लक्ष्मण**—दादा ! स्त्रियांची आणि तशांत वडील माणसांची समजूत घालणं फार कठीण, त्याचा अनुभव आपल्याला आहेच. ( रागानें ) पण दादा या एकंदर सर्व खटपटीची मला आठवण झाली, ह्मणजे आंगाची कशी लाही होऊन जाते. ती दुष्ट चांडाळीण कैकई, ती आमची आई नव्हे , तिला काय कृत्या ह्मणावें किंवा हत्या ह्मणावें, कांहीं कळत नाहीं. मला वाटतं ही राक्षसी आह्मांला क्लेश देण्याकरितांच जन्मली आहे. किंवा स्त्रीच्या रूपानें “ सवतमित्सर ” निर्माण झाली आहे, किंवा समग्र अयोध्येला दुःख देण्याकरितां जगली आहे काय ह्मणावें काय? दादा तुह्मी आई ह्मणतां ह्मणून, नाहींपेक्षां केव्हांच एक घाव आणि दोन तुकडे करून टाकले असते ! ! बाबा तर केवळ स्त्रीलंपट होऊन असलेही तिचे दुष्ट हेतु पुरे करायला तयार

झाले आहेत ! ! पुनः पुनः मनांत येतें कीं, या एकंदर कृत्यांचें बीजच समूळ नाहींसें करून टाकावें.

राम—बाळा लक्ष्मणा, साधारण पुरुषांप्रमाणें असा काय रागावतोस ? क्षुल्लक गोष्टीसाठीं तुला हें शोभत नाहीं. अरे आपली संपत्ति क्षांति शांति आहे. मग असें काय बरें करतोस ? लक्ष्मणा विचारकर शांत हो, धैर्य धरण्याची हीच वेळ आहे, इतके दिवस शास्त्रांचा अभ्यास केलास तो व्यर्थचना ? गुरुमहाराजांच्या उपदेशाचे श्रम फुकट गेलेना ? अरे तुझ्यासारख्याची अशी स्थिति होणें फारच वाईट. तुझ्यासारखे क्रोधाचे स्वाधीन होतात, तेव्हां काय ह्मणावें? बाबा शांत हो शांत हो. तुला एकच मुख्य गोष्ट सांगतो ती ऐक–

## साकी

षड्रिपु व्यापित शरीर अवघें ॥
क्रोध मुख्य समजावा ॥
दुष्कर्मी तो मनुजा पाडी ॥
ह्मणुनी सोडित जावा ॥
यांताचि हीत असे ॥
साधक वृत्ती हीच दिसे ॥ १ ॥

लक्ष्मण—दादा या दूषित बंधूला आपल्या क्षमे·

वांचून दुसरें प्रायःश्चितच नाहीं. ( असें ह्मणून पायां पडतो. )

[ म—बाळा ऊठ ऊठ. अरे त्यांत काय आहे. एकानें दुसऱ्यास सांगावें हा धर्मच आहे. आपल्याला उशीर झाला चला आपण आपली निघण्याची तयारी करूं.

( जातात. )

---

## प्रवेश ६ वा.

---

( सुमंत प्रवेश करतो. )

सुमंत—( आपल्याशीं ) शेवटीं रामचंद्रादि त्रिवर्गांची वनवासाला जाण्याची तयारी झाली ! ! हाय हाय ! ! काय घोर प्रसंग हा ! ! ! कैकई अजूनही तुझ्या हेतूचें साफल्य झालें नाहींना ? त्या सकुमार राजबिडयांचीं वस्त्राभरणें या दुर्दैव्याच्या हातांनीं ब्राह्मणार्पण झालीं ह्मणजे तरी कृतकृत्य हो. काय अवदेसेनें एकेक कृत्य केलें तरी शिव शिव ! शिव ! एक तर आमचे युवराज महाराजांना अरण्यांत लावून दिलें. आमच्या सौख्यास दिगंतरास लावून दिलें. व सर्व प्रजेला अनाथ करून सोडलें ! ! हर हर ! ! अयोध्ये तुलाही रामाचा कंटाळा आलाना ? नीटच आहे—रामलक्ष्मणा.

सारखे योद्धे वनवासी झाल्याखेरीज तुझ्या नांवाची सार्थकता तरी कशी होणार ! हे दीनदयाळा देवा ! तुलाही आमची कोणाची दया आली नाहीं ना ? दया संपली ह्मणावं तर तूं दयेचा सागर आहेस. भवितव्यते, अखेरीस तूंच यशस्वी झालीस ! ! बरं आहे तर मग तूंच आपलं राज्य चालीव. ज्यांत राम नाहीं अशा ठिकाणी रहाण्यापेक्षां सर्व नागरीक जनास अनुसरून आपणही रामाबरोबर जावें हें बरें. ( पडद्याकडे पाहून ) अरे लक्ष्मण आणि सीता ह्यां सहवर्तमान वनांत जाण्याकरितां रामचंद्र महाराज अगदीं तयार होऊन आले.

(राम सीता लक्ष्मण पांढरे पोषाक करून येतात)

**राम**—दिवाणजी, आपल्याला फार काय सांगूं तथापि—

साकी

राज्य रूपही नौकावाहक ॥
मुख्य तुह्मी समजावें ॥
यश कीर्तीची ध्वजा असावी ॥
निशिदिनीं दक्ष रहावें ॥
सकला घेऊनी । जावें नयसिंधू तरुनी ॥ १ ॥
आणखी—

गोविंद मार्तंड दिक्षित
जमखंडी
खासगी पुस्तकालय

पद :

( वाडवडिलां सेवित जावें या चा
तात भरता सांभाळावें ॥
प्रिय त्यांचें नित्य करावें ॥
राज्य पद ना भरता ठावें ॥
बाल त्याला फार जपावें ॥
समदृष्टी सर्व पहावें ॥
तत्व हेंचि मनीं ठसवावें ॥
निशिदिनींहो दक्ष रहावें ॥
सुखदायक सकलां व्हावें ॥
सुखकर नीति हीच म्हणावी ॥
निपुण तुह्मी मी काय वदावी ॥ १ ॥

**राम**—बरं तर येतों आतां आह्मी. ( सर्व जातात. )

( वशिष्ठ प्रवेश करतो. )

**वशिष्ठ**—हर हर ! ! शेवटीं दशरथाचे कपाळीं हेंच यावें ना !

साकी :

नित्य सुखाचें धाम राम हा ॥
धाडी आजि वनांत ॥
कल्पतरू तो तोडुनि टाकी ॥
हो अपकीर्ति जगांत ॥
दुष्कर्मी होई ॥ रविकुल मळवुनिया जाई ॥१॥

( सद्गदित होऊन )

रामचंद्रा—

दिंडी
अरे रामा वनवास तुला होई ॥
लक्ष्मण तो मागुती तुझ्या येई ॥
धर्म पत्नी ही तुझी सती राहो ॥
सकल भुवनीं वंद्यही कीर्तिलाहो ॥
दैवाचि गति विचित्र आहे ! ! !

पद--भैरवी
( या विरहा कां भीसी या चा० )
काय करूं नशिबा तें ॥
विधिलेखन तें सत्यचि होतें ॥ काय करूं॥धृ०॥
दशरथ इकडे व्याकुल होई ॥
आशा त्याची उरली नाहीं ॥
वनवासा हे जाती पाहीं ॥
अंध न झालों नेत्र नको ते ॥

( पडदा पडतो )

अंक ४ समाप्त.

# श्रीरामराज्य वियोग.

## अंक ५.

### प्रवेश १ ला.

स्थळ—राजवाड्या बाहेरील प्रदेश.

( विनत प्रवेश करितो. )

**विनत**—शेवटीं त्या दुष्ट मंथरेनें आपलें म्हणणें खरें केलें ! ! आमच्या धूर्त दिवाणजींनीं जरी तिला कारागृहांत कोंडून ठेवून सक्त पहारा ठेविला होता, तरी तिनें तेथूनही आपली सुटका करून घेऊन मनांतला दुष्ट हेतु सिद्धीस नेला. ह्या चटकीच्या हातून काय होणार होतें ह्मणा, पण तिला ती राक्षसी कैकई अनुकूल झालीना ? त्यामुळें तर हा असा अनर्थ झाला. "रामचंद्र महाराजांनीं वनवासी व्हावें" हें ऐकल्या पासून सरकारची प्रकृति अगदींच बिघडून गेली आहे. ह्या दुःखांतून ते वांचतील अशी कांहीं आशा दिसत नाहीं ( पडद्याकडे पाहून ) हा पहा माझा मित्र उन्नत वाड्यांतून इकडेच येत आहे. त्याला महाराजांचा समाचार विचारावा.

( उन्नत येतो. )

मित्रा उन्नता, तूं आतां राजवाड्यांतूनच आलासना? महाराजांची तब्बेत कशी आहे? तूं अगदीं जवळ असणारा ह्मणून विचारतों?

**उन्नत**–अरे बाबा काय सांगूं! फार वाईट झालें सरकारांचा पुत्रवियोग दुःखानें शेवट केला.

**विनत**–अरे! अरे! अरे! ( डोळयांस पदर लावून) एकूण आपल्या सरकारचा असा शेवट झालाना!! शिव! शिव! शिव!

**उन्नत**–विनता तुला काय सांगूं तो प्रसंग? रामचंद्र महाराज वनवासाला जाणार हें ऐकल्यापासून सरकारची प्रकृति अत्यावस्थ झालीच होती त्यांतच 'गेले' हें समजलें मात्र आणि त्यांचें प्राणोत्क्रमण झालें.

**विनत**–अखेरपर्यंत शुद्धींत होतेना?

**उन्नत**–शुद्धींत ह्मणजे काय विचारतोस? राम! राम! राम! असा सारखा घोष चालला होता.

**वि०**–मुलांपैकीं कुणी जवळ तरी होतें कां?

**उ०**–छे मुलांपैकीं कोणी जवळ नव्हतें. जवळ आपले गुरु महाराज, दिवाणजी आणि कौसल्या सुमित्रा इतकी मंडळी होती. कौसल्या सुमित्रा ह्यांच्या डोळ्यांचें पाणी तर थांबलेंच नाहीं. सर्व मंडळी डोळे असून आंधळ्याप्रमाणें, कान असून बहिऱ्याप्रमाणें झाली होती. कौसल्या, सुमित्रा मोठमोठ्यानें आक्रोश क-

रीत होत्या. जिकडे तिकडे हाहाःकार चालला होता.

वि०---हर ! हर ! हर ! मग पुढें काय झालें ?

उन्नत---मग बऱ्याच वेळानें गुरुमहाराजांनीं सर्वांचें शांतवन करून भरतशत्रुघ्नास आणविण्याची तजवीज केली आणि ते आल्यावर भरताकडून उत्तरविधी करविला.

वि०---इतकें झालें तरी त्या पाषाणहृदयी कैकईला द्रव आला नाहींना ? तिला कशाचा द्रव येणार. भरताला आतां राज्याभिषेक होण्याला कांहीं अडथळा राहिला नाहीं ह्मणून तर तिला उलटा आनंद वाटला असेल.

उन्नत---हें काय विचारतोस ? अरे ह्या सगळ्या अनर्थाला तर तीच कारण. तिला संतोषच झाला; पण बाबा तिचा मुलगा मात्र " भांगेंत तुळस " या ह्मणीप्रमाणें तिच्या पोटीं आला आहे.

विनत---तें कसें काय ?

उन्नत---या सगळ्या अनर्थाला कारण कैकई हें ऐकून त्याला जो क्रोध आला, त्यांत त्यानें तर तिची फारच निंदा केली. रामचंद्र महाराजांच्या ठिकाणीं त्याचें प्रेम फारच. सरकारच्या मरणापेक्षां रामचंद्र महाराज अरण्यवासाकरितां गेले हें ऐकून त्याला फार दुःख वाटलें.

विनत—पण आतां कैकईच्या हेतुप्रमाणें राज्याभिषेक त्यालाच व्हायचा असेल ?

उन्नत—कैकईचा हेतु, पण भरत कुठें कबूल आहे. तो तर एकसारखा राम, राम, ह्मणून भजन करतो आहे. मला राम दाखवा, मला राम भेटवा, असें ज्याला त्याला विचारतो आहे.

विनत—कायरे उन्नता, आपले दिवाणजी देखील रामचंद्र महाराजांबरोबर गेले असें ह्मणतात तें खरें काय ?

उन्नत—अरे खरं ह्मणजे एकटे दिवाणजीच बरोबर जाण्यास निघाले होते असं नाहीं. सगळी अयोध्या लोटली होती, पण बरें झालें कीं वामदेव त्यांना भेटले त्यांनीं चार समजुतीच्या गोष्टी सांगून त्या सर्वांना मागें परतिवले.

विनत—रामचंद्र महाराज गेल्यानें त्यांना आधीं दुःख झालेंच आहे. त्यांत आतां हे सरकारचें वर्तमान समजलें कीं, ते काय करतील कोण जाणें. आपल्या दिवाणजीची स्वामीभक्ति मोठी निस्सीम खरी.

उन्नत—( पडद्याकडे पाहून ) ती पहा दिवाणजीची स्वारी उदासीन मुद्रेनें इकडेसच येत आहे तर विनता, चल आपण आपल्या कामास जाऊं.

( नंतर उदास झालेले दिवाणजी प्रवेश करतात. )

## प्रवेश १ रा.

समंत—( आपल्याशीं ) पुत्रवियोगदुःखानें सरकारचा अंत व्हावा हा त्या श्रावणाच्या उग्र शापाचाच परिणाम ! ! काय मी हतभागी ! माझ्या नशिबीं काय काय पाहण्याचें येणार तें कळत नाहीं. हे प्रसंग अनुभवण्यास परमेश्वरा मला कां जिवंत ठेवलेस ? सरकारच्या पूर्वीच माझे डोळे झांकले असते तर बरं झालें असतें. रामचंद्र महाराजांबरोबर मी अरण्यवासी होऊन राहण्यास तयार होतों; पण त्यांनीं जो मला कानमंत्र सांगितला त्यामुळें इकडे परत येणें भाग पडलें आणि आलों तो हा प्रकार. आज आह्मां सर्व जनास कोणी स्वामी नाहीं अशी अवस्था झाली ! हे कमलनेत्रा दाशरथे रामा, आज्ञेप्रमाणें सर्व जनास अनुसरून मी परत आलों, पण आतां स्वामीच राहिला नाहीं तर मी सेवा कोणाची करावी ? कोणाच्या आज्ञेंत वागावें ! दशरथ महाराज, आपण तर ऐहिक सुखाचा त्याग करून अक्षय सौख्याचें स्थान मिळविलें, पण मी मात्र अंतःकरण शुन्य होतसातां मागें जिवंत राहिलों आहे. हे सार्वभौम राजा दशरथा, एखाद्या क्षुल्लक बाबतींत देखील आपण माझें अनुमो-

ईन येत होतां, असें असतां या प्रसंगीं दासाला मुसतें कळविलें देखील नाहीं? सिंहासनारूढ होतांना माझा हात धरावा लागत असे मग यावेळीं सेवेकाची अपेक्षा न करतां आपण एकटेच स्वर्गारोहण कसें केलें!! ( इकडे तिकडे पाहून व कानोसा घेऊन ) कोण येत आहे बरें? भरत येतो आहे असें वाटतें, [ उश्वास टाकून ] हा हतभाग्या सुमंता, त्यानें राम कुठें आहे ह्मणून विचारलें तर त्याला तूं काय सांगशील? [ किंचित विचार करून ] त्यापेक्षां त्याचे दृष्टीस न पडून येथूनच चालतें व्हावें हें बरें.

( निघून जातो )

( भरत वैराग्य वेशानें प्रवेश करितो )

पद

( भोलानाथ दिगांबर या चा० )

भरत—

रामसखा वनीं जाई। परी तें सुखकर मजला नाहीं॥
रामसखा वनीं जाई॥ ध्रु०॥
इंद्रादिक हे वंदिति ज्यातें। मुनिजन हृदयीं राही॥१॥
सीतापति हा पूर्ण सनातन, लागतसे मी पायी॥२॥
दुष्ट अभागी या कुंत्यानें, कारण कैकयी होई॥३॥
तर मग आतां कैकईकडेसच जावें—

( जातो. )

शांतादुर्गा महानंद [illegible] लिखित
पुस्तकालय
नंबर ...... मिरज.

## प्रवेश ३

( कैकई बसली आहे. )

कैकई—( आपल्याशीं ) भरताला राज्याभिषेक व्हावा ह्मणून मी किती तरी दीर्घ प्रयत्न केले. पण त्या पोराच्या डोक्यांत काय वेड शिरलें आहे कुणाला ठाऊक? बहुतकरून त्या थेरड्यानें त्याला भलभलतें सांगितलें असावें ह्मणूनच तो वेडेचार करतो आहे.

( इतक्यांत भरत येतो )

कैकई—बाळा तुझ्यासाठीं मी ही सर्व खटपट करून हें राज्य मिळवून ठेवलें आहे. तुला एकदां सिंव्हासनावर बसलेला पाहिला ह्मणजे मला फार आनंद होईल. बाळा, तूं आतां खुशाल राज्यकर तुला आतां अगदीं भीति नाहीं.

भरत—हा दुष्टे चांडाळणी कैकई—

पद

( चतुर सुगर तूं नार शहाणी या चा० )

फुकट जनन तव जग हें मानी ॥
निंद्य होसी तूं जन्मा येऊनी ॥ धृ ॥
मोद तुला तो रामगमनवनीं ॥
लाविशी कैसा स्वकरें आमी ॥
भूमी भार तव मनी तूं आणी ॥
किती निष्ठुर तव माते करणी ॥
काय वदुं तुज चळ जा येथुनी ॥
फुकट जनन तव ॥ १ ॥

कैकई—काय यांत काय तुझें वाईट झालें आहे ? तुला कांहीं समजत नाहीं. मी हें सर्व पुरता विचार करूनच केलें आहे.

भरत—हर ! हर ! अग पापिणी—

पद

( काय मला भूल पडली—या चा० )

शिव शिव तवहृदय कठिण जाहलें कसें ॥
मोक्ष तुला कैकई कां सांग मिळतसे ॥
तातनिधन इष्ट तुला हेतु तव दिसे ॥
राज्यभोग विपद मला सौख्य मुळीं नसे॥१॥

हा दुष्ट चांडळणी कैकई, मला राज्य मिळावें ह्मणून तूं आपल्या पतिचाही प्राण घेण्यास तयार झालीसना ! तुझे मुखावलोकन सुद्धां नको. स्त्रीचरित्राची अगदीं कमाल करून मोठी ध्वजा लाविलीस. हर ! हर ! !

कैकई—अरे " देव देतो नि कर्म नेतें " तुझ्याच जर नशिबीं राज्यभोग नसले तर ते कोठून लागणार ? तूं फुटक्याच नशिबाचा. ऐक—

पद

( अरसिक किती हा शेला या चा० )

दैव कसें तव बाळा । भ्रष्टमती तव झाली कपाळा ।
धृ.॥ यत्न किती मी केले । रामगमन मग अजि तें झालें ॥
राज्य आतां तुज आलें । विन्मुख आजि तूं होसि कशाला ॥ १ ॥

भरत—अग पापिणी, मला फुटक्या नशिबाचा कां

म्हणतेस ! ! तूं मात्र महत्पापी कर्महीन अशी आहेस म्हणूनच तुला श्रीराम मुखाचे संनिध्याला मुकण्याची बुद्धि होत आहे. अग कामधेनु घरांत असतां तूं होऊनचग बाहेर घालविलीस. राम ! राम ! राम ! परमेश्वरा, अशा अभागिणीचे पोटीं मी कसारे जन्मलों ! कैकई ऐक–

पद

( नम्र होतीं फलभारें तरुवरसारे या चा० )

काय माते पापीणी कैसें केलें गे ॥
प्रखर तेजा तव संगें लांछन आलें गे ॥
जनन माझें तव जठरीं कैसें झालें गे ॥
खचित वाटे वडिलां तूं नरकीं नेलें ॥१॥कायमातें॥

कैकई–अहाहा ! ! ! कृतघ्ना बैस तर आतां असाच. मेल्या असाच रडत बसशील. मला तोंड दाखवूं नको. ( जाते. )

भरत–( आपल्याशीं ) अरे रघुकुलतिलका रामा, तुला या दुष्ट कैकयीमुळें वनवासना ! ! ! परमेश्वरा—

पद

( जाते कीं मम शकुंतला या चा० )

गेला कीं मम प्राण विसावा, । सोडुनि आजिवना ॥
रामावांचुनी स्थीर नसे मन । कांहिंच वदवेना ॥ध्रु०॥
जेवि जळाविण मीन तसा मी । प्रेमपूर नयना ॥
योग्य तुला हें गमलें रामा । हाचि तुझा नय ना ॥१॥
॥ गेला० ॥

हे मत्प्राणसंजिवना रामा, तुला आतां मी कोठें पाहूं ! तूं कोठें असशील ? काय करीत असशील ! रामा मला एकवार तरी भेट देरे. माझ्या विषयीं इतकी उपेक्षा कारे ? माझ्या करितां तुझें आणखी वाईट व्हायचें काय उरलें आहे ? रामा तूं आज असा निष्ठुर कां बरं झालास ? तुझ्या चरणीं लीन झालेल्या भरताला एकदां तरी भेटरे.

( पायां पडावयास जातो व पडतो. )

सावध होऊन—

हाय हाय काय मी वेड्यासारखा एकटाच बरळत आहे? माझा राम कोठें आणि मी कोठें ? मला कोणी राम दाखवितां कारे ? येथें कोणीच नाहीं. असो, वशिष्टमुनींना तरी जाऊन रामाचा शोध विचारावा. आतां मला रामावांचून कांहीं दिसत नाहीं:—

पद.

( कंथ विन रही अकेली मेरी जान या चा० )

सदोदित राम स्मरावा राम ॥
सदोदित राम स्मरावा राम ॥
होत मना आराम ॥ धृ० ॥
मंगळदायक नाम प्रभूचें ॥
देत असे निजधाम ॥ १ ॥
भव भय भीति उरत नसे ती ॥
पार करी श्री राम ॥ २ ॥

ध्यायि विनायक प्रेमानंदें ॥
बलवंतचि तो राम ॥ ३ ॥
[ पद म्हणत निघून जातो. ]

## प्रवेश ४ था.

( वशिष्ट येतो. )

वशिष्टः— पदः

[ मज्जीवन केवल शकुंतला या चा० ]

जय श्री रामा मंगल धामा ॥
चिन्मुख शांती स्थल तूं रामा ॥
जगदाधारा पूर्ण विरामा ॥
कलिमल दहना पावन रामा ॥
बलवंतचि तूं सीतारामा ॥
पार नसे तव आगमा निगमा ॥
जपतां प्रेमें तुझिया नामा ॥
निज पदकमलीं देशि अरामा ॥
तूंची विनायक लोका रामा ॥
अविनाशी तूं सत्य प्रकामा ॥ १ ॥

अहाहा ! प्रभु रामचंद्राच्या नामस्मरणानें मनाला किती तरी सौख्य होतें. रामनामाचा महिमा अगाध आहे ! तो जाणणारेच जाणतात. अरे ( कानोसा घेऊन ) प्रभुरामचंद्राचें भजन कोणरे करीत आहे ? अरे हा रामभक्त भरत हिकडे येत आहे.

( भरत "रामस्मरावा राम" हें पद ह्मणत येतो व नमस्कार करितो. )

वशिष्ट—वाळा तुझे हेतु पूर्ण होवोत. बा भरता—

दिंडी.

राज्य पद हें येतसे तुला पाही ॥
अरुढ होई सूत्र तूं हातीं घेई ॥
राज्यनीती सेवुनी सुखद व्हावें ॥
अरे भरता कीर्तिला गाजवावें ॥ १ ॥

भरत—( तिरस्कार करून ) हर ! हर ! ! गुरुजी हें काय सांगतां ! ! "त्या त्रैलोक्याधिपति रामाला जाऊन भेट" असें सांगण्याचें सोडून "तूं राज्य कर" असें आपण सांगतां काय ? आपण गुरुजी अहां, मी काय बोलावें ! आपल्या ह्या उपदेशानें इतकें मात्र होत आहे—

पद.

( दूर मी झालें या अंकाच्या या चा० )

वंद्य तुह्मी परी निंद्यच होतां ॥
कटु वचनें वदुनी ॥
श्रेष्ट गुरूपण नष्टची होतें ॥
राम नसे ह्मणुनी ॥
रामपदीं मन रामची होवो ॥
नश्वर श्रीही सौख्य न मानी ॥ १ ॥

गुरुमहाराज, कृपा करून माझा राम कोणीकडे गेला आहे तें सांगा. मी त्याचा शोध

करीत करीत तिकडेसच जाईन. मला हें तुमचें राज्य नको, ऐश्वर्य नको, कांहीं नको. मी फक्त रामदर्शनाचा भुकेला आहे. हा मी निघालों पहा.

वशि०—बाबा, तूंही जर निघून गेलास तर मग संपूर्ण प्रजेचें पालन कोण करील? का सर्वांनीं तुझ बरोबरच यावें? कांहीं विचार कर. असा दुराग्रह धरूं नको.

भरत—मी सर्व विचार पूर्वींच केले आहेत. ज्याला पाहिजे असेल तो येईल अथवा न येईल मी तर जाणारच. ( जाऊं लागतो ) "राम स्मरावा राम" हें पद ह्मणतो.

वशि०—अरे तुझा जर निश्चयच झाला आहे तर मग मला तरी येथें राहून काय करायचें आहे? चल मीही तुझ्या बरोबरच येतों.

( दोघे जातात. )

## प्रवेश ५ वा.

[ पश्चातापयुक्त बसलेली कैकयी प्रवेश करिते. ]

कैक०—काय मी हतभागी चांडाळीण!! ह्या सर्व प्रजेचे दुःखाला कारण झालें आहे!! खचीत भरताचें प्रेम रामावर कमी नव्हतें. माझी तरी रामावर ममता कमी का होती! असें असून त्यावेळेस रामाविषयीं माझे मनांत

वाईट कां बरें आलें ? काय भुरळ पडली कोण जाणे ! ( विचार करून ) ह्याला कारण ती मेली मंथरा. मेलीनें माझ्या मनांत रामाविषयीं नाहीं नाहीं तें भरवलेंन. काळस्वरूपी मेली मंथरा होऊन पूर्वजन्मींचा दावा साधलान आणि माझा घात केला. माझ्या तोंडाला काळोखी आणलीन. आतां मला मरण येईल तर बरें मण तें तरी कसें येणार ! या पापिणीला त्या मृत्यूकडे तरी जागा मािहजेना ! हे माते वसुंधरे, तूं तरी कृपा करून मला पोटांत घे ! अथवा वीष खाऊन प्राण द्यावा, परंतु तें कोण देईल ! कोण आहेग तिकडे अगे दासी ? काय कोणीच ओ देत नाहीं. ठीकच आहे आतां अपकीर्ति माझी दासी ती च-हूंकडे माझा डंका करीत असेल. रामा आतां सर्व तूं आहेस. तूं दया सिंधु आहेस. तुला बरें दिसेल तें कर. मी अनाथ दीन अपराधी रामा तुला शरण आलें आहे ! रामा दया कर ! दया कर ! अंत नको रे पाहूं ! राम राम !

पद.

( बघुनी उपवना या चालीवर )

पूर्ण अभागी जन्मा आलें । चांडाळिण मी कशी ॥
निष्ठूर वचनें वदलें रामा । कृत्या वदते जशी ॥

दुष्कर्मानें लांच्छन अलें । मातृपणातें मशीं ॥
राहु जसा तो ग्रासुनी टाकी गगनीं राकाशशी ॥ १ ॥
॥ चाल ॥ तो राम कधीं मी असमर्थ पाहीन ॥
मम प्राण विसावा अंकावरी न येईन ॥
मुख कमलाला रामाच्या चुंबिन ॥
करुणेचा तूं सागर रामा शरण आलें मी तुशीं ॥
दर्शन देई दीन दयाळा ध्यान तुझें मानसीं ॥

असो नित्य नियमाप्रमाणें देव दर्शनाची वेळ झाली तर आतां तिकडेसच जावें.

( कैकयी जाते. )

---

## प्रवेश ६ वा.

---

वसिष्ठ व भरत येतात.

**वसिष्ठ**—भरता तो पाहिलासका जनसमुदाय रामदर्शनाकरितां आपल्या मागून येत आहे तो.

**भरत**—गुरुमहाराज ज्याला ज्ञान आहे, ज्याला मन आहे, सारांष जो जीवंत आहे तो त्या रामहीन अयोध्येंत कसा राहील ? यावयाचाच. ( मार्गाकडे पाहून ) पण गुरुजी माझा राम ह्याच मार्गानें गेला काहो ? आपण मार्ग तर चुकलों नाहींना ?

**वसिष्ठ**—ह्या अरण्यांत एक गुहक नावाचा किरात राहत असतो त्याला आपण विचारूं. तो

सर्व सांगेल. (पुढें पाहून) तो पहा हिकडेसच येत आहे.

(गुहक येतो)

भरत—कायरे गुहका, सीता, राम, लक्ष्मण ह्याच वाटेने गेलीं काय?

गुहक—होय महराज ह्याच वाटेने गेलीं.

भरत—गुहका तुझ्या जन्माचें सार्थक झालें. अरे त्यांना ही नदी उतरून पलीकडे कोणी नेलें. (गुहक घाबरल्यासारखें करितो) अरे भिऊं नको, कोण्या भाग्यवानाला त्यांचें दर्शन झालें तें सांग. म्हणजे त्यांच्या तरी पायां पडूं.

गुहक—महाराज मला तें कांहीं समजत नाहीं आह्मी आपल्या पायाचें चाकर. आपली सेवा करावी इतकें मात्र माहीत आहे.

भरत—अरे येथें राम किती दिवस होते मग कोणी कडे गेले वगैरे सर्व सांग पाहूं!

गुहक—ऐकावें महाराज—

पद

(निजरूपी जगदा कृती मासा ही चाल.)

ह्याच वनीं हो प्रभुजी होते ॥
लक्ष्मण सीता तेही तसे ते ॥ धृ ॥
ह्याच तरूतळीं दीर्घ जटा त्या ॥
मस्तकीं धारण करितच होते ॥ १ ॥
सीतेसह प्रभु ह्याच शिळेवर
बसुनी तिचे श्रम हरिताचि होते. ॥ २ ॥

आणखी हीच त्यांची दर्भशय्या. रामचंद्र महाराज तीन दिवस येथें होते.

भरत—शिव ! शिव ! शिव ! ! ! जें ऐकण्यास प-हाण्यास वें बोलून दाखविण्यासही कठीण तें सर्व प्रत्यक्ष अनुभवण्याची पाळी रामा मी असतां तुझेवर आलीना ! ! अरे ते सर्व राज्यभोग जाऊन वनवास भोगीत आहेसना ! ! ! हर ! हर ! ! रामा काय रे ही स्थिति ! हे भाक्तना तुझ्याजवळ आवडनिवड कांहीच नाहींना ! धिक्कार असो तुला. लक्ष्मणा तूं धन्य आहेस. अशा संकटसमयीं तूं मात्र बंधुत्वाला जागलास. तुझे हात पुण्यवान म्हणूनच रामचरण सेवेला पात्र झाले. तुझ्या नेत्रांचें साफल्य नित्य रामदर्शनानें झालें. हे सकल वृक्षपाषाणांनो तुमच्या भाग्याचें किती वर्णन करूं—

पद

( माझा कृष्ण देखिला काय ही चाल )

ह्याहुनी भाग्य असे तें काय ।
सकलही वृक्षांनो ॥ धृ० ॥
सुरवर मुनिवर मुखीं हें नाम ।
रमती रामीं मुळ हें स्थान ॥
दुर्लभ भेटे वनीं श्रीराम ।
पावन आज तुम्ही झालां ॥ १ ॥

अरे गुहका राम येथून किती दूर आहे ?

ह्या वेळेस तो कोठें असेल ? तो ह्याच मार्गानें गेला नाहीं बरें ?

वसिष्ठ—भरता आतां फार लांब जावयास नको.

भरत—( भूमीकडे पाहून हातांनीं धूळ उचलून ) हे मात वसुंधरे—

पद.

( वदनीं घर्म जलाला या चा० )

पावन होईन मात ॥
तुज धरितों शिरीं सुख होतें ॥
स्पर्श तुझा श्रेय देतें ॥
जणूं राम सखा मज भेटे ॥ १ ॥

गुहक—महाराज आपण अगदीं जवळ येऊन पोहोंचलों. अंमळ पुढें गेलों ह्मणजे रामाश्रम दिसूं लागेल.

भरत—कायरे गुहका—

साकी.

तोचि गिरिवर ज्यावर दिसती ।
उंच तरूवर फार ॥
गगनां शिवती भासची होतो ।
शिखरीं तगही गार ॥
आश्रमतळीं वाट ।
आहे राम सखा तेथें ॥ १ ॥

( चालूं लागतात. )

(राम लक्ष्मण व सीता आश्रमांत आहेत )

सीता—अहाहा ! ! ! भरता—

पद

( किती तरी पहाटेची वेळ मला [illegible] चा० )

अरे पहा, आश्रम हे [illegible]
सुखवी नयन हा ॥ धृ० ॥
दिसे सीता सती अंकीं बसे सौमित्रही
जवळी असे पर्वकाळ हा ॥ १ ॥

( भरत लगबगीनें जाऊन रामास आलिंगन देतो. नंतर राम नमस्कारपूर्वक वाशिष्टास उत्थापन देतो. )

राम---बाळा भरता---

पद.

( पुनरपि कधीं मी या चा० )

काय अशी ही तनु कृश झाली ।
पांडुरता किती वदनीं आली ॥ धृ० ॥
वस्त्राभरणें कांहीं न पाही ।
भार जटांचा किती हा होई ।
सोडुनी कां तुज श्री दुर गेली ॥ १ ॥

सख्या भरता माझ्यावांचून तिकडे तुला चैन पडणार नाहीं हें मला वाटलें होतेंच. मी जरी इकडे आलों आहे तरी माझें सर्व मन तुजकडेसच आहे. बाळा तिकडील हकीगत कशी काय आहे, सर्व खुशाल आहेत ना ? दिवाणजी राज्यकारभार पाहत असतीलच. कैकयी, सुमित्रा, कौसल्या ह्यांस अगदीं करमत नसेल नाहीं बरें ? शत्रुघ्न

बाळाला अगदीं ओकं ओकं झालें असेल ? तात महाराजांना चवदा वर्षे केव्हां जातील असें झालें असेल ? रात्रं दिवस माझा अगदीं त्यांनीं घोष घेतला असेल ?

**भरत**——रामा माझ्याच्यानें सांगवत नाहीं, हर ! हर ! काय विचारतोस ? सर्व सौख्याचा, दुःख, क्लेश, मन, विचार, शरीर आणि शेवटीं पृथ्वीचाही त्याग करून तातमहाराज परलोकवासी झाले ! !

**रामचंद्र**——हाय ! हाय ! ( पडतो ) काय हें संकट ओढवलें हें काय झालें ! मी सर्वस्वी बुडालों, हे निर्दया यमा तुला कांहींच कारे करुणा आली नाहीं ? अगे, पापिणी दुष्ट महा निद्रे, तात महाराजांनीं तुझा असा कोणता अपराध केला होता ? तात महाराज, एकाएकीं मजला सोडून कसे गेला ? आतां मी आपणास कोठें पाहूं ? मला सर्व दिशा शून्य झाल्या. हा माझा वनवास फुकट गेला ! मला तरी जगून काय करावयाचें आहे ! ( मूर्छित पडतो. )

**लक्ष्मण**——हा तात ! आजपर्यंत आमचें संगोपन करून आतांच तुम्हांला परलोकवास आवडला काय ? आतां आह्मी आपल्या छायेला अंतरलों ! राज्यभार संभाळून आपणांस सुख देण्याचें आमच्याच कपाळीं नाहीं ! केवळ तिळांजळी देण्याकरितांच आह्मी

जन्मलों. बाळा भरता, देहावसानसमयीं तूं तरी जवळ होतास कायरे ?

**भरत**—नाहीं रे आज्ञा नव्हती !

**लक्ष्मण**—आह्मी चवघे तर अंतरलोंच. परमेश्वरा आमची तरी तुला दया यावयाची होती ! ! !

**राम**—( सावध होऊन ) बाबा !

**पद**

( स्वर्गी सर्व पितर माझे ते या चालीवर )

तात, काय असें हें केलें परलोकीं गेला ॥
तें मन निष्ठुर कैसें झालें ॥
त्रास अधिक तो प्रियकर गमला ॥ धृ ॥
छत्र आह्मांवर तुमचें होतें ॥
ताप आतां हा दुःसह होई ॥
गोड तुझा हें रुसलें कैसें ॥
सौख्य असे मग काय आह्मांला ॥ १ ॥

**सीता**—प्राणनाथ; व्हावयाचें तें झालें. आपण अशा रीतीनें शोक करूं लागला, तर आमचें शांतवन कोण करील !

**लक्ष्मण**—मला वाटत होतें कीं, आह्मी परत गेल्यावर बाबा आह्मांला मांडीवर घेतील, वनांतील सर्व हकीगत विचारतील, राम सीते सहवर्तमान सिंव्हासनावर बसले आहेत व आह्मी जवळ उभे आहों असें पहातील आणि सर्व प्रकारें आमचे कौतुक करितील, पण ह्या सर्व कल्पना व्यर्थ किहो झाल्या !

राम—अरे बाळा लक्ष्मणा, अरे हे सर्व सुख सोहळे कल्पनांनीच जाणावयाचें. जन्माला येऊन ऐकावयाचें तें ऐकिलें. बाबा, प्राणोत्क्रमणाच्या वेदना कशाहो सहन करवल्या असतील !

वसिष्ठ—रामचंद्रा, अरे किंचित विचार कर. पहा, ह्या विचित्र संसारामध्यें भ्रमण करणाऱ्या सुखदुःखमय ज्या अनेक योनी, त्यांमध्यें निरनिराळ्या प्रकारें उत्पन्न होणारा, राहणारा व नाश पावणारा असा जो स्थावर जंगमात्मक लोक त्याची पाहिजे ती अवस्था होण्याचा संभव आहे. आतां, ह्याचें कारण त्रिगुणात्मक जो आत्मा त्याचाच कांहीं तरी परिणाम झाला पाहिजे. हें असो, अथवा—

पद.

( सांब सुरा भरणा या चालीवर. )

सर्वेश्वर नटला नटुनी नटनाटकीं झाला ॥ प्रभूतो ॥
ब्रह्मांडीं भरला भरुनी अवशिष्टचि उरला ॥ प्रभूतो ॥
सकलहि सत्ता त्याचे हातीं सूत्रधार बनला ॥ प्रभूतो ॥ १ ॥
संचित हें होतें कारण सुख दुःखा आधितें ॥ मनुजा ॥
दैवचि धागवितें सकलां यत्नाधिन नचतें ॥ मनुजा ॥
तत् इच्छेनें सकलहि झालें गमनवनीं तवतें ॥ रामा ॥ २ ॥

असें जर आहे तर, बाळ—

दिंडी.

सख्या रामा आवरीं शोक बाळा ॥
कळे तुजला सर्व हीं प्रभू लीला ॥

अरे रामा लक्ष्मणा सिता बाई ॥
कर्म फल तें मानवा सुटत नाहीं ॥ १ ॥
तर, आतां हा शोक पुरा कर. बंधूचें शांतवन कर. अरे, असा भ्रांतींत कां पडतोस? इतक्यांतच तुझें कर्तव्य संपलें नाहीं. विधिलेखन कोणाला चुकलें आहे काय? रामा, अरे नीट विचार कर, विचार कर.

राम——गुरुमहाराज, आपण सांगतां तें सर्व खरें आहे. आपल्यासारखा दुसरा ज्ञाता विरळा सांपडेल. आह्मांला आपलेच उपदेश मान्य आहेत. आपली आज्ञा आह्मांला शिरसावंद्य आहे.

( दुःखांत निमग्न होतो. )

( भरत बसलेल्या ठिकाणाहून कांहीं अंतरावर जाऊन अग्नि प्रदिप्त करून जवळ उभा राहतो. )

गोविंद महादेव लिमये ... मुंबई ... पुस्तकालय.

भरत—मी दशरथ महाराजांपेक्षांही भाग्यवान कीं मला आज रामदर्शन झालें. आतां मी कृतार्थ झालों. माझी सर्व तहान भूक हरली. हा देह पवित्र झाला. आतां जगून काय करावयाचें आहे. हे अग्निनारायणा तूं सर्व संग्रही आहेस, तर माझा स्वीकार कर. रामचंद्रा तूं तर पुत्रधर्मास योग्य असेंच आचरण केलेंस. लक्ष्मणा, रामचंद्रास अनुसरून आपल्या जन्माचें सार्थक केलेंस. सा-

राश, मी कांहीं केलें नाहीं. तर आतां तातमहाराजांचें अनुकरण करणें हेंच चांगलें. परलोकाशिवाय दुसरी मी कशाची इच्छा करावी! रामचंद्र मागें परतेल असें मला वाटत नाहीं, व मला बरोबर नेईल असेंही दिसत नाहीं. हे तृतीय तत्वा परमेश्वरा, श्री रामाच्या चिंतनानें बाबांस जी गति मिळाली तीच गति मला दे एवढेंच मागणें आहे. राम! राम! राम!

राम—( सावध होऊन ) बाळा भरता ( असें म्हणून इकडे तिकडे पाहूं लागतो, तों भरत लांब उभा आहे असें पाहून तिकडे जाऊं लागतो. ) अहो गुरुजी—

साकी

दर्भराशि ती भव्य करोनी ॥
जवळि भरत हा आहे ॥
अग्नीमाजी वाटतसें कीं ॥
देहार्पण करूं पाहे ॥
येऊनिया येथें ॥
गुरुजी बोध करा त्यातें ॥ १ ॥

वशिष्ट—बाळा भरता काय हें—

पद.

( सांगु नको ही मात—ही चाल. )
उचित नसे तुजला सोडी अविचाराला॥ धृ ॥
आत्मघातकी जो नर होतो ॥

इहपर सौख्या खचित मुके तो ॥
और तमीं गतीं त्याला । भरता अचित नसे ॥ १ ॥
सहजपणें तो मृत्यू येई ॥
प्रभुइच्छा तिस बंधन नाहीं ॥
सर्व कळे तुजला ॥ भरता उचित नसे ॥ २ ॥
सर्व घटीं प्रभु भरुनी राही ॥
क्षणभंगुर हें सकलहीं पाहीं ॥
राम असे भरला ॥ भरता उचित नसे ॥ ३ ॥

भरत—गुरुमहाराज, मला उपदेश करण्यापेक्षां रामालाच दोन गोष्टी सांगाना. माझें ह्मणणें त्यानें राज्य करावें आणि आह्मांपासून सेवा घ्यावी इतकेंच.

वशिष्ठ—अरे रामाची कुठें ना आहे. पण चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याला तसें करितां येत नाहीं.

भरत—कां बरें? व्हायचं तें होऊन गेलें आतां प्रतिज्ञेचें काय राहिलें आहे?

वशिष्ठ—अरे बाबा त्याचें कारण हें (कानांत)। असें आहे समजलास?

भरत—( हात जोडून ) आतां सर्व समजलों, परंतु राज्यासनीं रामाच्या पादुका सुशोभित करून "रामराज्य" ह्मणून कारभार पाहवा असें दिवाणजींना सांगण्याविषयीं रामाची मला आज्ञा असावी.

**राम**—बाळा, अरे तुझ्या मर्जी प्रमाणेंच होऊं दे त्याला माझी मुळींच ना नाहीं.

**भरत**—रामचंद्रा—

### पद

( भूपाळीचे चालीवर )

दीन लीन पदीं भरत असेहा शरण आलों पाही॥प्रभूरे॥
पतितपावना माझे रामा हेंचि मला देई ॥ धृ० ॥
अशातंतू मनीं धरुनी स्मरुनी तुतें राही ॥ रामा ॥
चवदा वर्षे भरतां झडकरी परत घरा येई ॥ १ ॥
अग्नीकाष्ट मी मलिन तुझी भेटजरि न होई ॥ रामा ॥
तुजवांचुन मज उदास सारे आनंदही नाहीं ॥ २ ॥

**राम**—शाबास भरता शाबास—

### पद

( केशव करणी अद्भुत लीला ही चाल )

धन्य धन्य तूं वंद्य खरोखर भरता या भूतलीं ॥
जनन तव धन्य करी माउली ॥ धृ० ॥
चवदा वर्षे भरतां परतची येईन या पाउलीं ॥
समज तूं भक्ती तुझी पावली ॥ १ ॥
वैराग्याचा ठसा तुझेवर दुःख उरतना मुळीं ॥
सरुपता प्राप्त तुला जाहली ॥ २ ॥
पूर्ण करो तव हेतु मनातील हिमनगजापती! बली ॥
विनायक तोचि जगा साउली ॥ ३ ॥

**वशिष्ट**—भरता आणखीं तुझें काय प्रियकरावें सांग.

**भरत**—महाराज आतां एवढें असावें—

## पद

( भैरवी. )

सौख्य असो सकलांतें ॥
परवालंबन दैन्य नकोतें ॥ धृ० ॥
आर्यजनाचा विनय असावा ॥
स्वातंत्र्याचा पूर असावा ॥
ज्ञानकलांनीं देश भरावा ॥
यश दुंदुभीही जाउ द्विपातें ॥ १ ॥
स्वधर्मप्रीती सकला राहो ॥
दुर्व्यसनाचें निर्मुल होवो ॥
बलवंताचि श्रीशंकरपावो ॥
हेंचि विनायक देउं आह्मांतें ॥ २ ॥

( पडदा पडतो. )

अंक ५ वा समाप्त.

गोविंद महादेव
पुस्तनंबर
शिवडी.